**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक :- ५७६/२०१५
सुनावणी दिनांक :- २६.०८.२०१५
निर्णय दिनांक :- २६.०८.२०१५

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजय कांतराव उदावंत,<br>१८२, चांडक आर्किटेक्ट,<br>शिवाजीनगर, परभणी। | : अपिलार्थी | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परभणी | : उत्तरवादी | अनुपस्थित |
| २. | प्रथमअपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, परभणी | : | अनुपस्थित |

राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद

<u>निर्णय</u>

प्रस्तुत प्रकरणात अपिलकर्ता यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १८.०२.२०१५ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना औरंगाबाद आयोगाच्या कार्यालयातून दिनांक १०.०६.२०१५ रोजी नोटीस काढून दि. ०३.०७.२०१५ रोजी अपिलाच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे सदरची सुनावणी दि.०३.०७.२०१५ रोजी झाली नाही. म्हणून दि. १२.०८.२०१५ रोजी पुन्हा नोटीस पाठविण्यात आली व प्रकरणात आज दि. २६.०८.२०१५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीस अपिलकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परभणी अनुपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परभणी हे देखील अनुपस्थित आहेत.

Scanned with CamScanner

तथापि अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रांची पाहणी करण्यात आली. त्यावरून असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी दि. १४.१०.२०१४ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करून अधिकारी व कर्मचारी यांच्या दैनंदिनीची व पगारपत्रकाबाबतची माहिती मागितली आहे.

परंतु आजच्या सुनावणीस अपिलकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी प्रथम अपिलीय अधिकारी हे देखील अनुपस्थित आहेत. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास माहिती देण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती आयोगाकडे उपलब्ध झालेली नाही.

अपिलकर्ता यांच्या दि. १४.१०.२०१४ रोजीच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी सदरच्या माहिती अर्जामध्ये कर्मचारी व अधिकारी यांच्या दैनंदिनीची प्रत आणि पगारपत्रकासंदर्भात माहिती मागितली आहे. परंतु अधिकारी आणि कर्मचारी यांच्या दैनंदिनीची माहिती आणि पगारपत्रकाची माहिती ही अधिकारी व कर्मचारी यांची वैयक्तिक स्वरूपाची माहिती असल्याचे दिसून येते. तसेच या माहितीमध्ये व्यापक जनहितही दिसून येत नाही. म्हणून अपिलकर्त्याने कर्मचारी व अधिकाऱ्यांशी संबंधित वरीलप्रमाणे मागितलेली माहिती ही त्यांची वैयक्तिक स्वरूपाची असल्याने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्याकडील स्पेशल लिव्ह पिटीशन क्र. २७७३४/२०१२ मधील निर्णय दि. ०३.१०.२०१२ नुसार वैयक्तिक स्वरुपाची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (१) (जे) नुसार प्रकट करण्यास अपवाद ठरविण्यात आलेली आहे. म्हणून अपिलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. परंतु अपिलकर्त्याने मागितलेल्या माहितीसंदर्भात अधिकारी आणि कर्मचारी हे ज्या वेतनश्रेणीत वेतन घेतात त्या वेतनश्रेणीची माहिती अपिलकर्ता यांना देय होत असल्यामुळे ती अपिलकर्त्यास उपलब्ध करून देणे संयुक्तिक होईल, म्हणून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परभणी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसात अपिलकर्ता यांच्या दि. १४.१०.२०१४ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे मागितलेल्या माहिती संदर्भात कर्मचारी व अधिकारी यांच्या वेतनश्रेणीची माहिती अपिलकर्ता यांना नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

२) वरील निर्देशासह सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २६.०८.२०१५**



Scanned with CamScanner

# राज्य माहिती आयोग,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडे सुनावणीसाठी असलेल्या प्रकरणांची यादी

## सुनावणीचा दि.26.08.2015

| क्र. | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| 11 | 0885/ 2015 | श्री. शेख जावेद शेख सत्तार, नई आबादी नांदेड जि.नांदेड | ज.मा.अ. कार्यालय शिक्षण विभाग, माध्यमिक, जिल्हा परिषद, नांदेड | शिक्षणाधिकारी-माध्यमिक- जिल्हा परिषद, नांदेड | 0 | वेळ सकाळी 02.30 वा |
| 12 | 1053/ 2015 | श्री. शेख जावेद शेख सत्तार, नई आबादी नांदेड जि.नांदेड | ज.मा.अ. कार्यालय शिक्षण विभाग, माध्यमिक, जिल्हा परिषद, नांदेड | शिक्षणाधिकारी-माध्यमिक- जिल्हा परिषद, नांदेड | 0 | वेळ सकाळी 02.30 वा |
| 13 | 0774/ 2015 | श्री. महंमद रहीमखाँ महंमद दुलेखाँ, विकास नगर, देगलूर रोड, मस्जिद जवळ, उदगीर ता.उदगीर जि.लातूर | ज. मा. अ. उप अधिक्षक, भुमि अभिलेख, उदगीर जि.लातूर | ज.अ.अ. उप अधिक्षक, भुमि अभिलेख, उदगीर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.30 वा |
| 14 | 0799/ 2015 | श्री. विनायक श्रीपती कराड, मु.पो.रामेश्वर ता.जि.लातूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रामेश्वर ता.जि.लातूर | विस्तार अधिकारी-पंचायत- पंचायत समिती, लातूर जि.लातूर | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 15 | 0811/ 2015 | श्री. गोरे प्रितीराज नरेंद्र, मु.गुळखेडा ता.औसा जि.लातूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गुळखेडा ता.औसा जि.लातूर | विस्तार अधिकारी-पंचायत- पंचायत समिती, औसा जि. लातूर | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 16 | 0812/ 2015 | श्री. भोसले हंसराज ध्वज, गुळखेडा, ता.औसा जि.लातूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गुळखेडा ता.औसा जि.लातूर | विस्तार अधिकारी-पंचायत- पंचायत समिती, औसा जि.लातूर | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 17 | 0576/ 2015 | श्री. संजय कांतराव उदांवत, 182, चांडक आर्किटेक्ट शिवाजी नगर, परभणी | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, कार्यालय, परभणी जि.परभणी | तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, कार्यालय, परभणी जि.परभणी | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 1[illegible] | [illegible]577/ 2015 | श्री. संजय कांतराव उदांवत, 182, चांडक आर्किटेक्ट शिवाजी नगर, परभणी | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, कार्यालय, परभणी जि.परभणी | तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, कार्यालय, परभणी जि.परभणी | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 19 | 0899/ 2015 | श्री. मनोज कैलासराव देशमुख, रा.सेनगांव ता.सेनगांव जि.हिंगोली | नायब तहसीलदार, पुरवठा, तहसील कार्यालय, वसमत जि.हिंगोली | तहसिलदार, तहसील कार्यालय, वसमत जि.हिंगोली | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 20 | 0901/ 2015 | श्री. मनोज कैलासराव देशमुख, रा.सेनगांव ता.सेनगांव जि.हिंगोली | नायब तहसीलदार, पुरवठा, तहसील कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली | तहसिलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |

सहायकाचे नाव व स्वाक्षरी

लघुलेखकाचे नाव व स्वाक्षरी

Scanned with CamScanner

# राज्य माहिती आयोग,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडे सुनावणीसाठी असलेल्या प्रकरणांची यादी

## सुनावणीचा दि.26.08.2015

| अ.क्र. | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| 11 | 0885/ 2015 | श्री. शेख जावेद शेख सत्तार, नई आबादी नांदेड जि.नांदेड | ज.मा.अ. कार्यालय शिक्षण विभाग, माध्यमिक, जिल्हा परिषद, नांदेड | शिक्षणाधिकारी-माध्यमिक- जिल्हा परिषद, नांदेड | 0 | वेळ सकाळी 02.30 वा |
| 12 | 1053/ 2015 | श्री. शेख जावेद शेख सत्तार, नई आबादी नांदेड जि.नांदेड | ज.मा.अ. कार्यालय शिक्षण विभाग, माध्यमिक, जिल्हा परिषद, नांदेड | शिक्षणाधिकारी-माध्यमिक- जिल्हा परिषद, नांदेड | 0 | वेळ सकाळी 02.30 वा |
| 13 | 0774/ 2015 | श्री. महंमद रहीमखाँ महंमद दुलेखाँ, विकास नगर, देगलूर रोड, मस्जिद जवळ, उदगीर ता.उदगीर जि.लातूर | ज. मा. अ. उप अधिक्षक, भुमि अभिलेख, उदगीर जि.लातूर | ज.अ.अ. उप अधिक्षक, भुमि अभिलेख, उदगीर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.30 वा |
| 14 | 0799/ 2015 | श्री. विनायक श्रीपती कराड, मु.पो.रामेश्वर ता.जि.लातूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रामेश्वर ता.जि.लातूर | विस्तार अधिकारी-पंचायत- पंचायत समिती, लातूर जि.लातूर | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 15 | 0811/ 2015 | श्री. गोरे प्रितीराज नरेंद्र, मु.गुळखेडा ता.औसा जि.लातूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गुळखेडा ता.औसा जि.लातूर | विस्तार अधिकारी-पंचायत- पंचायत समिती, औसा जि. लातूर | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 16 | 0812/ 2015 | श्री. भोसले हंसराज ध्वज, गुळखेडा, ता.औसा जि.लातूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गुळखेडा ता.औसा जि.लातूर | विस्तार अधिकारी-पंचायत- पंचायत समिती, औसा जि.लातूर | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 17 | 0576/ 2015 | श्री. संजय कांतराव उदावंत, 182, चांडक आर्किटेक्ट शिवाजी नगर, परभणी | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, कार्यालय, परभणी जि.परभणी | तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, कार्यालय, परभणी जि.परभणी | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 1[illegible] | [illegible]577/ 2015 | श्री. संजय कांतराव उदावंत, 182, चांडक आर्किटेक्ट शिवाजी नगर, परभणी | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, कार्यालय, परभणी जि.परभणी | तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, कार्यालय, परभणी जि.परभणी | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 19 | 0899/ 2015 | श्री. मनोज कैलासराव देशमुख, रा.सेनगांव ता.सेनगांव जि.हिंगोली | नायब तहसीलदार, पुरवठा, तहसील कार्यालय, वसमत जि.हिंगोली | तहसिलदार, तहसील कार्यालय, वसमत जि.हिंगोली | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |
| 20 | 0901/ 2015 | श्री. मनोज कैलासराव देशमुख, रा.सेनगांव ता.सेनगांव जि.हिंगोली | नायब तहसीलदार, पुरवठा, तहसील कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली | तहसिलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली | 0 | वेळ दुपारी 02.30 वा |

सहायकाचे नाव व स्वाक्षरी

लघुलेखकाचे नाव व स्वाक्षरी

Scanned with CamScanner